सेवापूर्ती समारंभ

फेब्रूवारी, ०८ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या एकूण ४१ सेवकांसाठी दिनांक २९/२/०८ रोजी कॅ.वडके सभागृह येथे सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. या ४१ सेवकांपैकी वयपरत्वे ३१, ऐच्छिक ८ व शारिरीकदृष्ट्या अपात्र झालेल्या २ सेवकांचा समावेश होता. निवृत्तांमध्ये मनुष्यबळ विकास कक्षाचे समन्वयक व कल्याणवार्ता मासिकाचे कार्यकारी संपादक श्री.लीलाधर वाबळे यांचा समावेश होता. या सेवापूर्ती समारंभास अध्यक्ष म्हणून मा. कर्णे गुरुजी, सभासद पुणे मनपा व प्रमुख पाहुणे म्हणून मा.भानुदास माने, उप आयुक्त (वि.का.क्र.२) उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.शिवाजी दौंडकर, कामगार कल्याणाधिकारी यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सेवापूर्ती समारंभ सुरु करण्याचा प्रमुख उद्देश वर्ग क्र. १ ते ४ मधील सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचा एकत्रितरित्या एकाच व्यासपीठावर सत्कार करणे आणि सेवकांच्या देय रकमा या वेळी आदा करणे असल्याचे आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश मिळत असल्याचे श्री.दौंडकर यांनी नमूद केले. मा.भानुदास माने यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये मन, विचार आणि समाधान या विषयावर समयोचित मार्गदर्शन केले. आयुष्यभर विविध स्तरावर जीवनासाठी झगडणाऱ्या मानवाने आपल्या चांगल्या विचारातून मन प्रसन्न ठेवून समाधान मिळविणे आवश्यक आहे. सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांनी या त्रीसूत्रीप्रमाणे वर्तन ठेवल्यास भविष्यकाळ उज्वल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षपदाच्या भाषणामध्ये मा. कर्णे गुरुजी यांनी महापालिकेचे सेवक अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये काम करीत आहेत. त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत, महापालिकेमध्ये स्वतंत्र मनुष्यबळ विकास कक्ष स्थापन झाला असून, तो अधिक सक्षम करण्याची गरज आहे, असे नमूद करुन सेवानिवृत्तांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात झालेल्या सत्कारास श्री.लीलाधर वाबळे यांनी समर्पक उत्तर दिले. आपल्या उत्तरामध्ये श्री.वाबळे यांनी महापालिकेतून ऐच्छिक सेवानिवृत्ती घेण्याच्या प्रवृत्तीमध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत प्रशासनाने सखोल विचार करुन या सेवकांच्या मुलाखती घेवून ऐच्छिक सेवानिवृत्तीच्या मूळ कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच, महापालिकेतील मनुष्यबळ विकास कक्ष अधिक सक्षम करण्याची गरज प्रतिपादन केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री.जयवंत शिंदे यांनी केले.

खातेनिहाय परीक्षांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

महापालिका प्रशासनातर्फे ज्युनिअर व सिनिअर ग्रेड लेखनिक पदासाठी अनुक्रमे लोअर व हायर डिपार्टमेंटल परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या परीक्षेस बसलेल्या ज्युनिअर ग्रेड लेखनिकांसाठी पीएमसी एम्प्लॉईज युनियनमार्फत विनामूल्य प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. या वर्षीही सदर प्रशिक्षण वर्ग दिनांक २०/२/२००८ पासून श्रमिक भवन येथे सुरु करण्यात आले आहेत. या वर्गाचे उद्घाटन मंगळवार दिनांक १८/३/२००८ रोजी मा.श्री.मनोहर भाटे, माजी उप आयुक्त (वि) यांच्या हस्ते व मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली श्रमिक भवन येथे झाले. या वेळी कामगार कल्याणाधिकारी श्री.शिवाजी दौंडकर, पीएमसी एम्प्लॉईजचे सरचिटणीस श्री. पांडुरंग सावंत, अध्यक्ष श्री.तुकाराम जगताप व युनियनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाषण करताना महानगरपालिका सेवकांसाठी राबवित असलेल्या अनेक उपक्रमांचा लाभ घेवून त्याचा उपयोग दैनंदिन कामकाजात करण्याचे आवाहन मा.मनोहर भाटे यांनी केले. या कार्यक्रमामध्ये हायर व लोअर परीक्षेस बसलेल्या मनपा सेवकांनी अनेक सकारात्मक सूचना केल्या. यामध्ये अभ्यासक्रम, प्रशिक्षण व प्रश्नपत्रिका, परीक्षेस बसण्याच्या संधी, इत्यादीचा समावेश होता. या सूचनांची दखल घेवून यापुढे महापालिका सेवकांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण संस्था, अभ्यासक्रमात मुलभूत बदल, इत्यादीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे मा.नंदकिशोर जगताप यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.पांडुरंग सावंत तर सूत्रसंचालन श्री.तुकाराम जगताप यांनी केले.

जागतिक महिला दिन

महापालिकेच्या नागर वस्ती विभागामार्फत गणेश कला क्रिडा मंच येथे मा. सौ.राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मा.महापौर यांच्या हस्ते महिलांच्या विविध स्पर्धांमधील विजेत्या गटांना स्मृतिचिन्हे देवून सन्मानित करण्यात आले. यामध्ये पथनाट्य, स्वच्छ परिसर, शेजार समूह गट, बचत वस्ती पुरस्कार, दांडिया स्पर्धा विजेत्या गटांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. या समारंभामध्ये महिला शक्ती विविध क्षेत्रात यशस्वी होत असल्या तरी त्यांना पुरेशा प्रमाणत संधी व प्रतिष्ठा मिळत नाही, अशी खंत मा. महापौर यांनी व्यक्त केली. शासन स्तरावर महिलांकरिता विविध योजना व कार्यक्रम घोषित केले जातात. यापेक्षा महिलांना सर्व क्षेत्रात संधी देवून त्यांच्या क्षमतावृध्दीला प्रतिष्ठा देणे आवश्यक असल्याचे मा. महापौर यांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.अ.वि.कळमकर, सह आयुक्त (नागर वस्ती) यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी सन १९८४ पासून आजपर्यंत शेजार समूह गट, व्यवसाय गट, बचत गट अशा माध्यमातून सुमारे एक ते दिड लाख महिलांचे उत्कृष्ट जाळे विणल्याचे नमूद केले.

जागतिक महिला दिनानिमित्त पुणे मनपा कामगार युनियनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य, उद्यान व पथ विभागाकडील महिला सेवकांना दिनांक ८ मार्च, ०८ रोजी अर्धा दिवसाची सुट्टी जाहीर करण्यात आली होती. पुणे मनपा कामगार युनियन आणि श्रमिक महिला मोर्चा यांचेतर्फे श्रमिक भवन ते मनपा भवन दरम्यान रॅली आयोजित करण्यात आली होती. या मोर्चामध्ये सुमारे ६००-७०० महिला सहभागी झाल्या होत्या. सर्व महिला मोर्चाने मनपा भवन येथे एकत्र येवून महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तदनंतर झालेल्या सभेमध्ये मा.मुक्ता मनोहर व प्रकाश जाधव यांनी महिला दिनानिमित्त ८ मार्च या दिवसाचे महत्व विषद करुन हल्ली प्रत्येक क्षेत्रामध्ये भारतीय महिलांनी आघाडी घेतली असून, हक्क प्राप्तीसाठी मोठ्या प्रमाणात जनजागृतीची गरज असल्याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती मेधा थत्ते यांनी केले.

कल्याणवार्ता
मार्च, २००८
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
कामगार कल्याण निधी
मा. प्रविणसिंह परदेशी
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖

❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/
१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org
फक्त खाजगी वितरणासाठी
(विनामूल्य)